# ५. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन MEASUREMENT OF NATIONAL INCOME

Dr. Smt. Rajani v. Sontakke
Associate Professor
Economics

# राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन

- प्रास्ताविक
- राष्ट्रीय उत्पन्न मापणाच्या पद्धती
- राष्ट्रीय उत्पन्न मापणातील अडचणी
- राष्ट्रीय उत्पन्न विश्लेषणाचा महत्त्व






# प्रास्ताविक: INTRODUCTION

- कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा निकष म्हणून तसेच आर्थिक विश्लेषणाचा साधन म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी महत्वाची असते.
- भारतात १९५५ पासून राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेची जबाबदारी"केंद्रीय सांख्यिकीय संगठना" (Central Statistical Organization) या संस्थेकडे सोपविली आहे.
- उत्पादन, उत्पन्न व खर्च हे तीन घटक आर्थिक व्यवहारांचा चक्राकार प्रवाह तयार करतात.
- उत्पादनामुळे उत्पन्नाला चालना मिळते, उत्पन्नामुळे खर्चाला व खर्चामुळे उत्पादनाला चालना मिळते.

# राष्ट्रीय उत्पन्न मापणाच्या पद्धती:

1. उत्पादन पद्धती
2. उत्पन्न पद्धती
3. खर्च पद्धती
4. सामाजिक लेखांकन पद्धती
5. इतर पद्धती

## १. उत्पादन पद्धती: Production Method

- देशात एका ठराविक कालावधीत ज्या वस्तू व सेवांचे उत्पादन झालेले असते त्यांचे पैशातील मूल्य लक्षात घेऊन राष्ट्रीय उत्पन्न काढण्यात येते.
- अर्थव्यवस्थेत शेती, उदयोग, बांधकाम, वाहतूक व दळणवळण इ. अनेक क्षेत्रे असतात. या विविध क्षेत्रात उत्पादित झालेल्या ज्या अंतिम वस्तू व सेवा आसतात त्यांच्या पैशातील मूल्याच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज काढण्यात येतो.
- या पदधतीत दुहेरी मोजणी होण्याची शक्यता असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातून मध्यस्थ वस्तू वगळणे आवश्यक असते.
- दुहेरी मोजणी टाळण्यासाठी वर्धित मूल्य विचारात घ्यावे लागते.

# वर्धित मूल्याची संकल्पना
# CONCEPT OF VALUE ADDED

या पद्धतीत एखाद्या वस्तूच्या उत्पादनाच्या सर्व टप्प्यात, मूल्यात जीएकून वाढ होते त्याची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यात येते.

वरील उदाहरणांचा आधारे असे लक्षात येते की मूल्यात जी वाढ होते त्याची बेरीज ही उत्पादनाचयस शेवटच्या टप्प्यातील वस्तूच्यास बाजारातील मूल्यइतकी आहे.

| उत्पादनाचे टप्पे | वस्तूची किंमत(रु. प्रति किलो) | वर्धित मूल्य (रु.) |
|---|---|---|
| १. ऊसाचे उत्पादन | १० | १० |
| २. ऊस तोडणी, वाहतूक इ. | १५ | ०५ |
| ३. साखरेचे उत्पादन | २० | ०५ |
| ४., किरकोळ विक्रेता | २५ | ०५ |
| एकूण | ७०रु. | २५ रु. |

# २. उत्पन्न पद्धती: INCOME METHOD

एक विशिष्ट कालखंडात देशातील सर्व व्यक्ती व संस्था यांच्या उत्पन्नाची बेरीज केली अडत राष्ट्रीय उत्पन्न मिळते.

या पद्धतीत उत्पादनाच्या भूमी, श्रम, भांडवल, संगठन या घटकांना मिळणाऱ्या मोबडल्याचा समावेश असतो.

एक विशिष्ट कालखंडातील एकूण खंड, एकूण वेतन, एकूण व्याज व एकूण नफस यांची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

यालाच घटक खर्च पद्धती असेही म्हणतात.

- राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घ्यावयाची दक्षता:

1. हस्तांतरित उत्पन्नाचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश करू नये.
2. ज्या सेवांना कोणताही मोबदला मिळत नाही त्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.
3. व्यावसायिक संस्थांनी वाटप न केलेल्या नफ्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.
4. विदेशी व्यापारातून निर्माण झालेल्या देणींची नोंद राष्ट्रीय उत्पन्नात करावी.
5. उत्पादन प्रक्रियेत भाग घेतल्यानंतर जे उत्पन्न मिळाले असते त्याचा उत्पन्नात विचार करावा.
6. एकच उत्पन्न दोनदा मोजले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
7. उत्पादन कार्यासाठी स्वतः च्या घटकाचा वापर केला असेल तर त्याच्या मोबडदलयाचा बाजार किमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नात समावेश करावा.

## 3. खर्च पद्धती,: EXPENDITURE METHOD

अर्थव्यवस्थेत अंतिम वस्तू व सेवा यावर जो खर्च होतो त्या आधारे राष्ट्रीय उत्पन्न मोजता येते.

एका विशिष्ट कालावधीत देशात एकूण जो खर्च होतो त्या खर्चाची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न मिळते. या पद्धतीत राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी खाजगी खर्च आणि सरकारी खर्च अशा दोन्ही खर्चाला एकत्रित करण्यात येते.

एकूण खर्च पद्धतीत समाविष्ट होणारे खर्च,,,:

1. वैयक्तिक उपभोग्य खर्च
2. सरकारच्या सेवा व वस्तूवरील खर्च.
3. खाजगी देशांतर्गत गुंतवणूक
4. निव्वळ निर्यात

- खर्च पद्धतीत घ्यावयाची दक्षता:

1. खर्चाची दोनदा मोजणी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
2. अंतिम उपभोग्य वस्तूवर होणारा खर्च विचारात घेतला पाहिजे.
3. खर्च समबंधीची माहिती व्यवस्थित, अचूक आणि खात्रीशीर असावी लागते.
4. विदेशी व्यापारातून उदभवणारी जी देणी असतात त्याची नोंद राष्ट्रीय उत्पन्नात करण्यात आली पाहिजे.

प्रा. फिशर च्या मते, " अर्थव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीच्या वास्तव खर्च आणि बचत यांचे अनुमान लावणे कठीण असते. त्यामुळे ही पध्दत अचूक निष्कर्षाप्रत पोहोचू शकत नाही."

# सामाजिक लेखांकन पद्धती: SOCIAL ACCOUNTING METHOD

- १९३० च्या महा मंदी नन्तर अर्थशास्त्री रिचर्ड स्टोन, जे आर हिक्स , हेराल्ड ईडी, एलन पिकॉक इ. नि सामाजिक लेखांकन पद्धतीचस विकास केला. या पद्धतीनुसार केवळ राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप केले जात नाही तर, देशाची सम्पूर्ण आर्थिक संरचना, विविध क्षेत्रातील शसम्बन्ध आणि आर्थिक क्रियांची विस्तृत आकडेवारी वेगवेगळ्या लख्यांचे रूपाने सादर केली जाते.

- रिचर्ड सोन, "सामाजिक लेखांकन पद्धतीनुसार देशातील लोकसंख्येला उत्पन्नाच्या आधारावर वेगवेगळ्या वर्गात विभक्त केल्या जाते. प्रत्येक वर्गात समाविष्ट असणाऱ्या काही लोकांच्या उत्पन्नाचे मोजमाप करून त्याआधारे सरासरी उत्पन्न काढले जाते. त्या वर्गातील एकूण लोकसंख्येला सरासरी उत्पन्नाने गुणून त्या वर्गाचे उत्पन्न माहिती केले जाते.."

# ५. इतर पद्धती : OTHER METHODS

- व्यावसायिक गणना पद्धती:  या अंतर्गत वेगवेगळ्या व्यवसायाच्या आधारावर राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप केले जाते.
- कुजनेट्स ने दोन पद्धती सांगितल्या आहेत—

1. वस्तू व सेवा पद्धती
2. उत्पन्न प्राप्त पद्धती
3. उपभोग्य-बचत पद्धती


Graphic (c) LoopAll/Shutterstock


Thank you!
shutterstock.com • 95578066